वेळ -२ तास **CODE - OSMIUM** गुण- ५०

प्र.१ **खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे लिहा.** २०

१) विंदा करंदीकरांच्या प्रेमकवितांचे वेगळेपण तुम्ही अभ्यासलेल्या 'जातक' काव्यसंग्रहातील कवितांच्या आधारे स्पष्ट करा.

२) "चिंतनात्मकता हे विंदा करंदीकरांच्या कवितांचे वैशिष्ट आहे." 'जातक' काव्यसंग्रहातील तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे चर्चा करा.

३) "विंदा करंदीकरांच्या 'जातक' काव्यसंग्रहातील कवितेत उपरोधाबरोबरच जीवनविषयक चिंतनही प्रकट होते" तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे परामर्श घ्या.

४) विंदा करंदीकरांच्या कवितांची वैशिष्टये तुम्ही अभ्यासलेल्या 'जातक' काव्यसंग्रहाच्या आधारे सोदाहरण लिहा.

प्र.२ **खालीलपैकी कोणत्याही <u>दोहोंवर</u> टीपा लिहा :** १०

१) 'दंतकथा' कवितेचा आशय.

२) 'वेडाचा भास होतो' या कवितेतील प्रेमानुभव.

३) 'पडसाद' कवितेचे वेगळेपण.

४) 'साठीचा गझल' कवितेचे रसग्रहण.

प्र.३ अ) **खालीलपैकी <u>एका</u> विषयावर वर्तमानपत्रासाठी ५० ते ६० शब्दात बातमी तयार करा.** ४

१) ऑलिंपिक स्पर्धेत भारताला सुर्वणपदक प्राप्त झाले.

२) गुजरात येथे झालेल्या बॉम्बस्फोटात अनेक जण ठार झाले.

**ब)** अण्णा भाऊ साठे महामंडळात श्री. शंकर साळवी मुख्य लिपिक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना आपल्या भविष्यनिर्वाह निधीतून ३०,००० रुपये इतकी रक्कम मुलीच्या लग्नासाठी हवी आहे. श्री. साळवी गेली पंचवीस वर्षे महामंडळाच्या सेवेत आहेत. या माहितीच्या आधारे ६० ते ७० शब्दात टिपण्णी लिहा. ४

**क) पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** ४

The gifts of modern science can be misused. The motor driven vehicles facilitates business and gives harmless enjoyment to many; but it can stream the roads with dead and dieing. Over two lakhs casualties in one year in this country alone. The cinema is a means of instruction and recreation opening 'magic casement' but it is often a channel of vulgarity and false values.

प्र.४ **खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर निबंध लिहा.** ८

१) दहशतवाद-समस्या आणि उपाय.

२) नको ते भारनियमन!

३) मी पत्रकार झालो तर ?

४) माझा आवडता चित्रपट.

**********************************************************************************